# इचलकरंजी महानगरपालिका,इचलकरंजी
## आस्थापना विभाग
## प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदांसाठी जाहिरात

शासन अधिसूचना दिनांक २९ जुन २०२२ अन्वये इचलकरंजी नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर होवून इचलकरंजी महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे.महाराष्ट्र शासन,नगरविकास विभागाकडील दिनांक २७.०७.२०२२ चे शासन निर्णयान्वये इचलकरंजी महानगरपालिकेकरिता ४३ पदांच्या आकृतीबंधास मंजुरी मिळालेली असून सदर मंजूर आकृतीबंधातील खालील पदांसाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील प्रतिनियुक्तीने नियुक्तीसंदर्भातील विहीत कार्यपद्धतीनुसार इच्छुक व अर्हतापात्र अधिका-यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी | अर्हता (मंजुरीसाठी प्रस्तावित) |
|---|---|---|---|---|
| १ | शहर अभियंता (स्थापत्य) | १ | एस २३-६७७००-०८७०० | राज्य शासनाच्या अधिक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता या संवर्गातील अधिकारी |
| २ | वैद्यकीय अधिकारी(आरोग्य) | १ | एस २०-५६१००-१७७५०० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची MBBS व जन औषध वैद्यकशास्त्र पदव्युत्तर पदवी ( M.D. in PSM/Community Medicine) किंवा MBBS व DPH पदविका आणि किमान ३ वर्षांचा अनुभव. |

उपरोक्त दोन्ही पदांवर शासनाकडून इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रस्तावित आकृतीबंधास मान्यता मिळून विहीत पद्धतीने अधिकारी नियुक्ती होईतोपर्यंत कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर अधिकारी नियुक्त करावयाचे असून इच्छुक व अर्हतापात्र अधिका-यांनी त्यांचे अर्ज दिनांक १२.१२.२०२२ पुर्वी महानगरपालिकेच्या www.ichalkaranjinp.co.in या संकेतस्थळावर Online सादर करावेत, तसेच अर्जाची एक प्रत आपल्या नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करावी. Online अर्ज सादर करणे शक्य न झाल्यास प्रत्यक्षरित्या दोन्ही प्रशासकीय विभागास उक्त विहीत मुदतीत सादर करावेत.यासंदर्भात शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील निर्देश अंतिम राहतील.

दिनांक १७.११.२०२२

(डॉ. प्रदीप ठेंगल)
उपायुक्त,
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned by CamScanner